## अखेर युद्ध सुरू; रशियाचा युक्रेनवर हल्ला



**किव (युक्रेन) :** रशियाने युक्रेनवर अखेर हल्ला केला आहे. गेल्या महिन्याभरापासून दोन्ही देशांचे सैन्य एकमेकांसमोर उभे ठाकले होते. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी गुरुवारी (दि. २४) लष्करी कारवाई करीत असल्याची घोषणा केली. युक्रेनची राजधानी असणाऱ्या किव आणि इतर अनेक शहरांमध्ये रशियन सैन्याने हवाई हल्ल्याद्वारे मोठे स्फोट घडवून आणले आहेत. रशियाने युक्रेनच्या एअरबेसवरसुद्धा हल्ला केल्याचेही वृत्त आहे, तर युक्रेनने रशियाला प्रत्युत्तर दिले असल्याचा दावा केला आहे. त्यांनी रशियाच्या पाच विमानांना आणि हेलिकॉप्टरला पाडल्याचे म्हटले आहे. दरम्यान, युक्रेनमध्ये हजारो भारतीय अडकले असून त्यांच्या मदतीसाठी मोदी सरकारने हेल्पलाइन सुरू केली आहे.


शुक्रवार, २५ फेब्रुवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २१९

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


कर्नाळा अभयारण्य परिसरात आगीचे सत्र/३

किल्ले रायगड डोंगरउतारावर भूसंपादनास आक्षेप/५

प्रो कबड्डी : आज पाटणा वि. दिल्ली फायनल/६


# नवाब मलिक मंत्रिपदाचा राजीनामा द्या!

## पनवेलमध्ये भाजपचे जोरदार आंदोलन





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना कोणत्याही राजकीय गुन्ह्यात अटक झालेली नाही, तर मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींशी त्यांनी जमिनीचा व्यवहार केला आहे. मलिक यांनी दिलेल्या पैशाचा वापर अंडरवर्ल्डने देशाविरुद्ध केला. अशा देशद्रोह्यांशी नवाब मलिक यांनी सौदा केलाच कसा, असा सवाल करीत त्यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी गुरुवारी (दि. २४) पनवेलमध्ये भाजपच्या वतीने आंदोलनातून करण्यात आली.

नवाब मलिक यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी (मनी लॉण्डरिंग) बुधवारी अटक केली असून न्यायालयाने त्यांची कोठडीत रवानगी केली आहे.

या पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये भाजपकडून घोषणा देत आंदोलन करण्यात आले. भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयासमोर उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कोकण म्हाडाचे माजी सभापती व भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, **(पान २ वर..)**

### मविआ सरकारकडून घोटाळेबाजांना संरक्षण –आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज यांचा वारसा असलेले आपले राज्य आहे, मात्र आपल्या या राज्यात देशद्रोह्यांना मदत करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचा निंदनीय प्रकार महाविकास आघाडीकडून सुरू आहे. जमेल तेथे भ्रष्टाचार करा आणि त्यातून निवडणूक लढा हे सूत्र महाविकास आघाडीकडून राबविले जात आहे. कर्नाळा बँक घोटाळ्यातही राज्य सरकारने कोणतीच कारवाई केली नाही. उलट या घोटाळ्याचे प्रमुख विवेक पाटील यांना पाठीशी घालण्याचे काम राज्य सरकारने केले. ईडीने कारवाई केली आणि केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेतल्याने ठेवीदारांचे विम्याच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत पैसे मिळत आहेत. पाच लाखांवरच्या ठेवीदारांचे काय आणि ज्यांनी त्यांचे पैसे बुडवले त्यांच्यावर राज्य सरकार कोणतीच कारवाई करीत नाही. विशेष म्हणजे विवेक पाटलांचे फोटो बॅनरवर बिनधास्त लावून मिरवले जात असून घोटाळेबाजांना महाविकास आघाडी सरकार संरक्षण देत आहे, असा घणाघाती हल्लाही त्यांनी चढवला.

> राज्याला नाही तर देशाला लाजवेल असे कृत्य नवाब मलिक यांनी केले आहे. कवडीमोलाने जमीन खरेदी हा एवढाच आरोप नाही, तर देशद्रोह्यांकडून जमीन घेतली हा मोठा आणि गंभीर गुन्हा आहे. महाराष्ट्राच्या जनतेने नवाब मलिकांना प्रेम दिले, मात्र त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचे काम मलिकांनी केले आहे. ते निर्दोष नाहीत. त्यांचे जावईसुद्धा ड्रग प्रकरणात अटकेत होते. शेतकरी, कष्टकरी, महिलांवर होणारे अत्याचार असे सारे प्रश्न असताना हे ठाकरे सरकार मात्र घोटाळे करीत सुटलेय.
>
> **–बाळासाहेब पाटील,** प्रदेश सदस्य, भाजप

> गेल्या दोन वर्षांत राज्य सरकारमधील मंत्र्यांचे घोटाळे उघड होत आहेत. या सरकारला सामान्य जनतेचे सोयरसुतक नाही. देशद्रोह्यांकडून जमीन खरेदी करीत महाराष्ट्राला डाग लावण्याचे काम नवाब मलिक यांनी केले. त्याचा निषेध करू तेवढा कमी आहे. महाविकास आघाडीत एकमेकांचे पटत नाही, मात्र सत्तेच्या हव्यासापोटी रेटून नेण्याचे काम सुरू आहे. मुख्यमंत्र्यांना जनतेचे प्रश्न ऐकायला वेळ नाही. थोडी तरी शरम असेल तर मलिकांनी राजीनामा द्यावा.
>
> **–जयंत पगडे,** अध्यक्ष, पनवेल शहर भाजप

## कर्नाळा बँकेच्या केवायसी न केलेल्या ठेवीदारांना आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ५४३ कोटींच्या आर्थिक घोटाळ्यापैकी पाच लाखापर्यंत रक्कम असलेल्या ठेवीदारांच्या ३७४ कोटी रुपयांचे वाटप करण्यास सुरुवात झाली असून ज्या ठेवीदारांनी आतापर्यंत केवायसी केली नाही किंवा त्यांचे दुसऱ्या बँकेतील खाते नंबर दिला नाही, त्यांनी पैसे मिळण्यासाठी त्याची लवकरात लवकर पूर्तता करावी, असे आवाहन कर्नाळा बँक अवसायक ए. आर. हांडे यांनी केले आहे.

अवसायक हांडे यांनी पैसे वाटप लवकर व्हावे यासाठी केलेल्या व्यवस्थेची माहिती देताना सांगितले की, आम्ही वेगवेगळ्या टीम केल्या आहेत. ठेवीदारांनी दिलेले केवायसी कागपत्र व दुसऱ्या बँकेतील खाते क्रमांक बरोबर आहेत की नाहीत याची तपासणी करतो. प्रकरण मंजूर होऊन आले असले तरी कोणाला कमी–जास्त जाऊ नयेत यासाठी आम्ही खबरदारी घेत आहोत. **(पान २ वर..)**

### कागदपत्रांची पूर्तता करावी

ज्या ठेवीदारांनी त्यांचे केवायसी कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांनी कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या कार्यालयात आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, फोटो व अन्य बँकेतील खात्याचा कॅन्सल चेक लवकरात लवकर पनवेल शहरातील टपाल नाका येथील शाखेत जमा करावा. पहिल्या टप्प्यातील वाटप पूर्ण झाल्यावर आता कागदपत्रे देणाऱ्यांना क्लेम मंजुरी, नंतर यादीतील क्रमाने किमान आठ दिवस अगोदर फोन करून दिवस व वेळ कळविण्यात येईल. तेव्हा ओळखपत्रासह यावे. ठेवींच्या मूळ पावत्या व पासबूक बँकेत जमा करून पोहोच दिली जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करून दोन–तीन दिवसांत संबंधित बँकेस ठेवीदारच्या खात्यात मंजूर रक्कम जमा करण्याची सूचना पाठवण्यात येईल. ठेवीदाराने स्वत: उपस्थित राहावे. एजंट किंवा बाहेरील व्यक्तीमार्फत संपर्क करू नये.

### केंद्र सरकारकडून दिलासा

*कर्नाळा बँकेच्या ठेवीदारांना डिपॉझिट इन्शुरन्स अ‍ॅण्ड क्रेडिट गॅरंटीकडून पाच लाखापर्यंतच्या ठेवींची रक्कम देण्यात येणार आहे. ठेव विमा व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन हा भारतीय रिझर्व्ह बँकेचा एक विशेष विभाग आहे जो केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. १५ जुलै १९७८ रोजी ठेव विमा व क्रेडिट हमी कॉर्पोरेशन कायदा १९६१ अंतर्गत ठेवींचा विमा व क्रेडिट सुविधांची हमी देण्याच्या उद्देशाने याची स्थापना करण्यात आली. विद्यमान केंद्र सरकारने त्यात बदल करून बँक अवसायनात निघल्यास ९० दिवसांत पैसे देण्याची तरतूद केल्याने हे पैसे मिळत आहेत.*

## निवडक

### इक्बाल कासकरच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**मुंबई :** आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या विशेष न्यायालयाने आरोपी इक्बाल कासकरच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांनी वाढ केली आहे. इक्बाल हा अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याचा भाऊ आहे. १८ फेब्रुवारीपासून तो न्यायालयीन कोठडीत आहे. मुंबईतील बांधकाम व्यावसायिकांना आणि सेलिब्रेटिंना खंडणीसाठी धमकावल्याप्रकरणी इक्बाल कासकरची ईडीमार्फत चौकशी सुरू आहे.

### माकडाने शाळेत शिरून घेतला विद्यार्थिनीला चावा

**कर्जत :** तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या जुम्मापट्टी येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली इयत्तेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थिनीला माकडाने चावा घेतला. या मुलीला नेरळ येथील सरकारी दवाखान्यात इंजेक्शन न मिळाल्याने उल्हासनगर येथे नेऊन इंजेक्शन घ्यावे लागले. दरम्यान, या घटनेमुळे पालकवर्गात घबराट पसरली आहे.

## बारावी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. परीक्षा तोंडावर असताना बारावी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. काही अपरिहार्य कारणास्तव पेपर पुढे ढकलण्यात आल्याची बोर्डाने माहिती दिली. येत्या ४ मार्चपासून बारावीची परीक्षा सुरू होत आहे.



भाषा विषयाच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. ५ आणि ७ मार्चला भाषा विषयाचे पेपर होणार होते, पण ते पुढे ढकलण्यात आले असून नवीन वेळापत्रकानुसार ५ आणि ७ एप्रिलला घेतले जाणार आहेत.

५ मार्चला प्रामुख्याने हिंदी, जर्मन, जपानी, चिनी आणि पर्शियन या भाषा विषयांचे पेपर होणार होते. ते पेपर आता ५ एप्रिलला होणार आहेत, तर ७ मार्चला मराठी, गुजराती, कन्नड, हिंदी, मल्याळम, तेलगु, पंजाबी, उर्दू, फ्रेंच अशा विषयांचे पेपर होणार होते, पण हे पेपर आता ७ एप्रिलला होणार आहेत.

पुणे–नगर मार्गावर बुधवारी पुण्याच्या दिशेने येत असताना एका ट्रकला आग लागली होती. या ट्रकमध्ये बारावीच्या प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्या होत्या. जळून खाक झालेल्या प्रश्नपत्रिका याच विषयांच्या असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बारावीच्या वेळापत्रकात अंशत: बदल करण्याची नामुष्की बोर्डावर आली आहे.



### पाहणी

**पनवेल : महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून मनपा क्षेत्रातील विविध समस्या सोडवण्यासाठी पाहणी दौरा सुरू आहे. या अंतर्गत त्यांनी गुरुवारी शहरातील लोखंडी पाडा व नवीन कोर्ट परिसरातील रस्ते आणि गटारांची पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासह रहिवासी उपस्थित होते.**

## नवाब यांचे भाऊ कप्तान यांनाही ईडीकडून समन्स?

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे अल्पसंख्याकमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी (मनी लॉण्डरिंग) बुधवारी अटक केली असून न्यायालयाने त्यांना ३ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली. त्यानंतर आता नवाब मलिक यांना आणखी एक धक्का बसला आहे. नवाब यांचे भाऊ कप्तान मलिक यांना ईडीने समन्स बजावले आहे.

दाऊद इब्राहिम टोळी क्रिकेटवरील सट्टेबाजी आणि बांधकाम व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याच्या आरोपावरून 'ईडी'ने दाऊद आणि त्याच्या नातेवाईकांविरोधात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी ईडीने दाऊदचा भाऊ इक्बाल कासकरला ताब्यात घेऊन चौकशी केली. दाऊदच्या हस्तकाशी संबंधित असलेल्या सुमारे ३०० कोटींच्या मालमत्तेचा व्यवहार करणाऱ्या कंपनीशी नवाब मलिक यांचा संबंध असल्याचे ईडीला तपासात आढळले. त्यानुसार ईडीने बुधवारी मलिकांवर कारवाई केली. ते सध्या कोठडीत आहेत.

एएनआयच्या वृत्तानुसार नवाब मलिकांना अटक केल्यानंतर ईडीने कप्तान मलिक यांना समन्स जारी केले आहे. कप्तान यांनी मात्र हा दावा फेटाळून लावला आहे. मला ईडीने कुठलीही नोटीस बजावली नाही, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## आक्षेपार्ह पोस्टला व्हॉट्सअ‍ॅप अ‍ॅडमिन जबाबदार नाही!

**तिरुवनंतपूरम : वृत्तसंस्था**

सोशल मीडियावर व्हॉट्सअ‍ॅप हा मेसेजिंग अ‍ॅप लोकप्रिय आहे. अनेकजण व्हॉट्सअ‍ॅपचा व्यक्तिगत मेसेजसोबतच ग्रुपवर चर्चा करण्यासाठीही वापर करतात, मात्र अनेकदा ग्रुपवरील मेसेजवरून वाद होतात. यानंतर यासाठी अ‍ॅडमिनला जबाबदार धरले जाते, परंतु व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये इतर सदस्यांनी आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास त्याला अ‍ॅडमिनला जबाबदार धरता येणार नाही, असा निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे.





### हायकोर्टाचा निर्वाळा

न्यायालयाने म्हटले, कोणत्याही मेसेजिंग सर्व्हिसवर ग्रुपमधील इतर सदस्यांनी केलेल्या पोस्टसाठी अ‍ॅडमिनला जबाबदार धरले जाईल अशी तरतूद असलेला कोणताही कायदा अस्तित्वात नाही. माहिती आणि प्रसारण कायद्यानुसार अ‍ॅडमिन हा मध्यस्थ नाही. अ‍ॅडमिनकडे मेसेज पुढे पाठवण्यासाठी येत नाही किंवा तो पाठवत नाही. ग्रुपचे सदस्य आणि अ‍ॅडमिन यांच्यात तसा संबंध नाही. त्यामुळे ग्रुपमधील इतर सदस्यांच्या मेसेजसाठी अ‍ॅडमिनला जबाबदार धरणे गुन्हेगारी कायद्याच्या मुलभूत सिद्धांतांच्या विरोधात आहे, असेही न्यायालयाने निकालात नमूद केले.

### शुभेच्छा!



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ४९वा वाढदिवस गुरुवारी होता. त्याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे. (अधिक छायाचित्रे पान २ वर..)**

नोकरदारांना खुशखबर!

## यंदा मिळणार मोठी पगारवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना महामारी सरल्यानंतर नोकरदारवर्गासाठी दिलासादायक माहिती एका सर्वेक्षणातून समोर आली असून यंदा गेल्या पाच वर्षांतील सर्वांत मोठी पगारवाढ मिळणार असल्याचा निष्कर्ष या सर्वेक्षणातून समोर आला आहे.

एऑन या संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून नोकरदारांसाठी खुशखबर ठरलेला हा निष्कर्ष समोर आला आहे. देशभरातील कंपन्यांनी या वर्षी अर्थात २०२२ सालात तब्बल ९.९ टक्के पगारवाढ होणार असल्याचे नमूद केले आहे. गेल्या वर्षी सरासरी ९.३ टक्के पगारवाढ झाली होती.

## एक्स्प्रेस वेवर अपघातात एक ठार, सहा जण जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर रसायनी हद्दीत झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



द्राक्ष भरलेला टेम्पो मुंबईकडे चालला असताना त्याचा टायर निकामी झाला. त्यामुळे टेम्पोमधील तीनजण खाली उतरले असता मागून येणाऱ्या प्रवासी बसने त्यातील एकाला धक्का दिला. त्यात ती व्यक्ती जागीच ठार झाली. अन्वर हुसेन (वय ५१, रा. उत्तर प्रदेश) असे या व्यक्तीचे नाव आहे, तर अपघातग्रस्त बसमधील महेश निलवे, अनिता निलवे (दोघेही डोंबिवली), चंद्रकांत मोरे, वासंती शिवाजी टकेकर (दोघेही आजरा), विश्व आंद्रेकर व अश्विनी आंद्रेकर या प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या. त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

# नवाब मलिकांना मंत्रिमंडळातून काढण्याचा 'ठाकरी बाणा' मुख्यमंत्री दाखवणार का?

## ■ भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा सवाल

**देशद्रोहीच्या राजीनाम्यासाठी भाजप आक्रमक**

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉम्बस्फोट करून शेकडो मुंबईकरांचे बळी घेणारा आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिम याचा हस्तक असलेल्या नवाब मलिक यांना सत्तेच्या लाचारीसाठी मंत्रीपदावर ठेवणे हा महाराष्ट्राचा अपमान असून उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दबावापुढे न झुकता मलिक यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून ठाकरी बाणा दाखवणार का, असा सवाल भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी (दि. २४) पत्रकार परिषदेत केला.

अनिल देशमुख यांचा जसा तातडीने राजीनामा घेण्यात आला तोच न्याय मलिक यांना लावला पाहिजे. दाऊदचा हस्तक असल्याचा आरोप हा देशद्रोहाएवढाच गंभीर असल्याने असा ठपका असलेला मंत्री राज्याच्या मंत्रिमंडळात असणे सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे, असेही ते म्हणाले.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेस प्रदेश प्रशिक्षण विभागाचे संयोजक योगेश गोगावले, किसान मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष वासुदेव काळे उपस्थित होते.

मुंबई महापालिकेसह अन्य निवडणुकांवर डोळा ठेऊन मुस्लिमांच्या अनुनयाकरिता देशद्रोही दाऊदच्या हस्तकास अभय देण्याचे हीन राजकारण ठाकरे सरकारच्या अधोगतीस कारणीभूत ठरेल, असा इशारा उपाध्ये यांनी दिला. नवाब मलिक यांनी दाऊदच्या दहशतवादी कारवायांकरिता पैसा जमा करण्याच्या कटास साह्य केल्याचा आरोप असून त्यासाठीचे सज्जड पुरावे ईडीकडे असल्याचा दावा करण्यात आला आहे. ज्या दाऊदने १९९२मध्ये मुंबईत भीषण बॉम्बस्फोट घडवून शेकडो निरपराध नागरिकांचे बळी घेत देशाविरुद्धचा सर्वांत घातक दहशतवादी कट आखला, त्याच दाऊदशी नवाब मलिक यांची हातमिळवणी असल्याचा गंभीर आरोप ईडीकडून करण्यात येत असतानाही मलिक यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेण्यास विरोध करण्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या लांगूलचनाच्या राजकारणाची मोठी किंमत महाराष्ट्राला मोजावी लागेल. मलिक यांना मंत्रिपदावर ठेवण्याच्या दबावापुढे झुकून मुख्यमंत्री ठाकरे यांनी आपण कणाहीन राजकारणी असल्याचे सिद्ध केले आहे, अशी टीकाही उपाध्ये यांनी केली.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ४९वा वाढदिवस गुरुवारी साजरा झाला. याबद्दल विश्वनाथ पाटील, समिता पाटील, दीपक भगत, जि. प. सदस्य अमित जाधव, भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, विद्या पवार यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख.

# महाविकास आघाडी सरकार हाय हाय!

## ■ मंत्री नवाब मलिकांच्या राजीनाम्यासाठी खारघर भाजपची निदर्शने

**खारघर : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रवादीचे नेते आणि महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री नवाब मलिक यांना बुधवारी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक करून त्यांची कोठडीत रवानगी केली आहे. त्यांनी डी गँगसोबत आर्थिक व्यवहार केल्याचा ठपका ईडीने ठेवला आहे. त्यामुळे खारघरमधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयासमोर गुरुवारी (दि. २४) निदर्शने करून नवाब मलिक यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या वेळी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

अटक झालेल्या नेत्याने त्वरित राजीनामा द्यायला हवा हे सांगताना भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल म्हणाले की, नवाब मलिक यांच्यावर बेहिशेबी मालमत्ता, दाऊदशी हितसंबंध, आर्थिक व्यवहार अशा सर्व गोष्टी तपासल्यावरच ईडीने मलिक यांना अटक केलेली आहे.

भाजप खारघर मंडल सरचिटणीस यांनी १९९३च्या बॉम्बस्फोटातील गुन्हेगार म्हणून जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीशी व्यवहार करताना दहशतवाद्यांना अप्रत्यक्षपणे मदत केल्यामुळे अटक झालेल्या नवाब मलिक यांनी नैतिकतेच्या आधारावर लवकरात लवकर राजीनामा द्यावा, कारण राष्ट्रसुरक्षेच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

या वेळी पनवेल महापालिका प्रभाग समिती सभापती संजना समीर कदम, नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, रामजी बेरा, शत्रुघ्न काकडे, सरचिटणीस दीपक शिंदे, कीर्ति नवघरे, युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत, समीर कदम, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, उपाध्यक्ष संध्या शारबीद्रे, सोशल मीडिया उपाध्यक्ष जिल्हा मोना आडवाणी, उपाध्यक्ष बिना गोगरी, संजय घरत, गुरूनाथ गायकर, दिलीप केणी, सचिन वासकर, जेष्ठ नागरिक अध्यक्ष नवनीत मारू, मुकेश गर्ग, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, उपाध्यक्ष प्रतीक्षा कदम, सीमा खडसे, आशा शेंडगे, विपूल चोटलिया, पप्पू खामकर, अशोक पवार, शैलेंद्र त्रिपाठी, रमेश महेंद्रू, अंजूबेन पटेल, स्मिता आचार्य, दुर्गेश, मीनाक्षी अंथवाल आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थितांनी बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली देऊन नवाब मलिक आणि राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# ५०० कोटी रुपये किमतीच्या अमली पदार्थाची विल्हेवाट

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथे उच्चस्तरीय औषध विल्हेवाट समितीच्या देखरेखीखाली सुमारे ५०० कोटी रुपयांच्या अमली पदार्थाची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. प्रिन्सिपल कमिशनर ऑफ कस्टम्स मुंबई यांच्या कार्यालयाने जप्त केलेले अमली पदार्थ, सायकोट्रॉपिक पदार्थ आणि विदेशी मूळ सिगारेट जप्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवली होती.

या अंतर्गत एकूण ३४३ किलो अमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ ज्यात २९३ किलो हेरॉईन आणि ५० किलो मेफ्रेडोन आहे. ज्याचे बाजारमूल्य अंदाजे ५०० कोटी रुपये आहे. त्याचबरोबर १९ मेट्रिक टन विदेशी सिगारेट ज्याची किंमत १५ कोटी आहे. या सगळ्याची विल्हेवाट कचरा व्यवस्थापन केंद्र तळोजा येथे लावण्यात आली. एनडीपीएस कायद्यानुसार अमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ नष्ट करण्यात आले. उच्चस्तरीय औषध विल्हेवाट समितीच्या देखरेखीखाली विल्हेवाट करण्यात आली.

ज्यामध्ये डीआरआय आणि एनसीबी विभागातील उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते, अशी माहिती मुंबई कस्टमचे प्रधान आयुक्त राजेश सनन यांनी दिली.

# शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत आदर्श उपविधीस मान्यता

**पनवेल : प्रतिनिधी**

दिनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांर्तत 'फेरीवाल्यांना सहाय्य' या घटकामध्ये फेरीवाला धोरणांतर्गत आदर्श उपविधीस पनवेल महापालिकेच्या शहर फेरीवाला समितीच्या सभेत गुरुवारी (२४ फेब्रुवारी) मान्यता देण्यात आली.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात झालेल्या बैठकीला शहर फेरीवाला समितीचे सर्व सदस्य, उपायुक्त कैलास गावडे, दिनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात उपस्थित होते.

फेरीवाला सहाय्य् अभियानांतर्गत शहरातील फेरीवाल्यांच्या विविध गरजा व समस्या सोडविण्यासाठी महापालिका पुढाकार घेत आहे. या अंतर्गत फेरीवाला समितीची स्थापना करण्यात आली आहे.

या बैठकीत फेरीवाला धोरण अंतर्गत महापालिका हद्दीतील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण व नोंदणी करणे, विक्री प्रमाणपत्र व ओळखपत्र तयार करणे, विक्री शुल्क व आकारणी करणे, फेरीवाल्यांसाठी बाजारपेठांचा विकास करणे, स्थिर फेरीवाल्यांसाठी जागेची निश्चिती करणे त्याचप्रमाणे फिरते फेरीवाले झोन, नो फेरीवाले झोन निश्चिती करणे या उपविधी विषयीचे प्रेझेंटेशन देण्यात आले. या आदर्श उपविधीस समितीने सर्वानुमते मान्यता दिली.

पान १ वरून

## मंत्री नवाब मलिक राजीनामा द्या!

भाजपचे उत्तर रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष केदार साठे, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, संतोष भोईर, नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील तसेच शशिकांत शेळके, युवा नेते दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, दिनेश खानावकर, सतिश पाटील, अभिषेक भोपी, वैद्यकीय सेलचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, राम पाटील, अमरिश मोकल, केदार भगत, अनेश ढवळे, भीमराव पोवार, प्रसाद हनुमंते यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाविकास आघाडीतील मंत्री घोटाळे करीत सुटले आहेत. सत्तेच्या हव्यासापोटी त्यांना आणि आता नवाब मालिकांना पाठीशी घालण्याचे काम महाविकास आघाडी सरकार करीत असल्याची घणाघाती टीका या आंदोलनातून करण्यात आली. मुर्दाबाद मुर्दाबाद नवाब मलिक मुर्दाबाद, धिक्कार असो धिक्कार असो महाविकास आघाडी सरकारचा धिक्कार असो, राजीनामा द्या राजीनामा द्या नवाब मलिक राजीनामा द्या, देशद्रोह्यांची जमीन विकत घेणाऱ्या नवाब मलिकांचा आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या ठाकरे सरकारचा धिक्कार असो, अशा गगनभेदी घोषणा उपस्थितांनी दिल्या.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, राजकीय किंवा इतर गुन्ह्यांमुळे नाही, तर देशद्रोह्यांकडून जमीन खरेदी केल्यामुळे ईडीने नवाब मलिक यांना अटक केली आहे, मात्र महाविकास आघाडी त्याचे समर्थन करून आंदोलन करीत आहे. विशेष म्हणजे भ्रष्टाचारी मंत्र्यांचा राजीनामा घेतला तर त्या खुर्चीत कोण बसणार याची चिंता महाविकास आघाडी सरकारला लागली आहे. म्हणूनच मलिकांचा राजीनामा घेण्यास ठाकरे सरकारने असमर्थता दाखवली आहे.

एकट्या मुंबईत १०० कोटी रुपये वसूल करण्याची सुपारी माजी पोलीस अधिकारी सचिन वाझेंना देणारे माजी गृहमंत्री व राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांचीही ठाकरे सरकारने पाठराखण केली. माजी वनमंत्री आणि शिवसेना नेते संजय राठोड यांच्या बाबतीतही तेच. राज्यातील सरकारचे घोटाळे बाहेर येताहेत, याचीच चिंता महविकास आघाडीला लागली आहे. नीतीमत्तेची जर चाड असती तर नवाब मलिक यांचा राजीनामा घेतला गेला असता, पण या सरकारला भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून कसेबसे सरकार चालवायचे आहे, असे सांगून आम्ही जनतेच्या सोबत आहोत. आमचे आंदोलन भ्रष्टचाऱ्यांना अद्दल घडविण्यासाठी आहे, मात्र महाविकास आघाडीचे आंदोलन पुढचा भ्रष्टाचारी मंत्री जेलमध्ये जायला नको म्हणून सुरू आहे, अशी जळजळीत टीका आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

> **नवाब मलिक हे वाचाळवीर आणि देशद्रोही मंत्री आहेत. महाराष्ट्राचे वाटोळे करणाऱ्या मंत्र्याला अटक झाली आहे. त्यांना कुणाला न्याय देण्यासाठी किंवा माता भगिनींवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अटक झालेली नाही, तर १९९३ साली झालेल्या मुंबई बॉम्बस्फोट हल्ल्यातील देशद्रोहींकडून जमीन खरेदी केली म्हणून अटक झाली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेने नौटंकी करीत अन्याय झाला अशी वलग्ना केली, पण खरेतर ईडीने आपल्या म्होरक्याला अटक केली याची चिंता महाविकास आघाडी सरकारला लागली आहे. गोरगरिबांना ईडी त्रास देत नाही, मात्र भंगारवाला तीन हजार कोटींची प्रॉपर्टी कशी करतो हे ईडीच्या निदर्शनास आले आहे.**
> **–विक्रांत पाटील, प्रदेशाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा**

> **महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारा प्रकार नवाब मलिक यांनी केला आहे. त्यांची देशविघातक वृत्ती स्पष्टपणे समोर आली आहे. याकूब मेमन याची फाशी रद्द करावी, अशी मागणी करणारे ते हेच नवाब मलिक आहेत, मात्र राजकीय फायद्यासाठी त्यांचा राजीनामा घेतला जात नाही.**
> **–मयुरेश नेतकर, जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड भाजप युवा मोर्चा**

## कर्नाळा बँकेच्या केवायसी न केलेल्या ठेवीदारांना आवाहन

पैसे वाटप करताना आम्ही अल्फाबेटिकल सिक्वेन्सने जातो. त्यामुळे जास्त वेळ जात नाही. यामध्ये ज्यांनी आमच्याकडे त्यांचे फोन नंबर दिलेत त्यांना फोन लावून बोलावून घेतो. रोज साधारण २५०–३०० लोकांना बोलवतो. त्यांची तपासणी करायला १० काऊंटर आहेत. त्यांचा बँक खाते नंबर व सगळे पेपर तपासतो. एका माणसाची सगळी प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी साधारण १५–२० मिनिटे लागतात. ज्यांना बोलावले आहे त्यांचेच पेपर घेऊन काम करतो. त्यामुळे पेपर शोधण्यात वेळ जात नाही. एखादा दुसऱ्या दिवशी आला तरी घेतो, पण त्याला थोडे थांबायला लागते. आम्ही लोकांना फोन लावून चार दिवसांनी बोलवतो. तरी अनेक जण येत नाहीत, असा आमचा अनुभव आहे. एखाद वेळेस त्यांना कामातून सुटी मिळत नसेल, पण सगळ्यांची सोय पाहणे आम्हालाही शक्य नाही.

ज्या ठेवीदारांनी आतापर्यंत केवायसी केली नाही किवा त्यांचे दुसऱ्या बँकेतील खाते नंबर दिला नाही, त्यांच्यासाठी एक स्वतंत्र केवायसी काऊंटर ठेवला आहे. तेथे बँकेच्या वेळात केव्हाही येऊन पेपर देऊ शकतात. त्यांनी पेपर जमा केले तरच आम्हाला त्यांना बोलावून पैसे देता येतील. यासाठी अशा ठेवीदारांनी लवकरात लवकर आपले पेपर जमा करावेत; अन्यथा त्यांना आम्हाला शोधत बसावे लागेल. आम्हाला चार महिन्यांत हे काम पूर्ण करायचे आहे, असे अवसायक हांडे यांनी या वेळी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आमच्या सगळ्या शाखेतील ठेवीदारांचे पैसे आम्ही सध्या इथेच देतो. महाडवाल्यांची मागणी आहे, पण आमच्याकडे तेवढे प्रशिक्षित कर्मचारी व आवश्यक इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांनी इथे येऊन फॉर्म भरल्यास बरे होईल, पण अगदीच ज्यांना शक्य होणार नाही त्यांना शेवटी आम्ही तेथे जाऊन देऊ. आमचे हे काम चार महिने चालणार आहे.

या वेळी अवसायक हांडे यांनी ठेवीदारांना तत्काळ पैसे मिळावेत म्हणून हे डीआयजीसीने पैसे दिले आहेत. त्यामुळे आमच्यावर (अवसायकवर) कर्जदारांकडून पैसे वसूल करणे आणि जप्त केलेल्या प्रॉपर्टी विकून मिळालेले पैसे हे पुन्हा डीआयजीसीला परत करण्याची जबाबदारी असल्याचेही सांगितले.

**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/सचिव/२०–२२/प्र.क्र.२३/५५/२२ दिनांक :– २४/०३/२०२२

**पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा**
**सभा सूचना क्र. ४५, दिनांक ०४/०३/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ०४/०३/२०२२ रोजी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे (आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल) या ठिकाणी Webex App द्वारे ऑनलाईन बैठक खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस खालील लिंकवर आपण आपल्या कार्यालयातून जॉईंट व्हावे.

Link : https://mh-dit.webex.com/mh-dit/j.php?MTID=m2b23444e4fdefe8bbb1b602948d83ed0
Meeting Number : 2514 942 2675
Password : 7tCj8Bwb8Jb

**सभा सूचना क्र. ४५ दिनांक ०४/०३/२०२२ ची**

**विषय पत्रिका**

**१) प्रश्नोत्तरे**

**२) मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**

१. प्रभाग समिती ''ब'' कार्यक्षेत्रातील महापालिका मालकीचे श्री काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली गावातील ग्रामस्थांकरिता श्री समर्थ महिला मंडळ यांना नाममात्र दराने शासन मान्यतेने उपलब्ध करून देणेबाबत.

२. पनवेल महानगरपालिका मालकीचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे व्यवस्थापन करणेकामी ०३ वर्षे कालावधीकरिता ई–निविदा मागविणेस तसेच सदरच्या खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

३) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नद्यांचे पूररेषा सर्वेक्षण करणेबाबत.

४) महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २९ दिनांक १४/०२/२०२२ रोजीच्या मंजुरीने महिला बालकल्याण विभागाअंतर्गत कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुलांना/मुलींना अर्थसहाय्य मिळणेकामीची योजना राबविणेबाबत सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

५) पनवेल महानगरपालिका मालकीच्या मलनि:स्सारण वाहिन्यांची दैनंदिन साफसफाई करणेकामी Jetting, Garbing & Rodding Machine ६ वाहने व Sewer Suction cum Jetting Machine with Recycling (१०,५०० लिटर) २ वाहने खरेदी करणेबाबत.

६) पनवेल महानगरपालिका मालकीच्या मलनि:स्सारण वाहिन्यांची दैनंदिन साफसफाई करणेकामी Jetting, Garbing & Rodding Machine या वाहनांचे परिचालन व देखभाल करणेकामी ५ वर्षाकरिता मनुष्यबळाचा पुरवठा करणेबाबत.

७) ''आजादी का अमृत महोत्सव'' या उपक्रमाची पनवेल महानगरपालिका अंतर्गत प्रस्तावित रुपरेषेनुसार कार्यक्रम साजरा करणेकरिता येणाऱ्या खर्चास मा. महासभेची मान्यता घेणेबाबत.

८) पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद नगररचना योजना पनवेल क्र. १ प्रथम फेरफार अंतिममधील अंतिम भूखंड क्र. ५०५ या भूखंडावरील कुळाचे नाव कमी करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ योजनेमधील दुरुस्तीकरणेकरिता पनवेल महानगरपालिकेस शासनाने प्राधिकृत केलेले असल्याने सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

(मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक :– २४/०३/२०२२**

**सोबत** – विषयांचे गोषवारे.

सही/–
**(तिलकराज खापर्डे)**
नगर सचिव
पनवेल महानगरपालिका, पनवेल

## निवडक

### उरणमध्ये प्राचीन वस्तूंचे प्रदर्शन

**उरण :** शिवराज युवा प्रतिष्ठानतर्फे दोन दिवस शिवजयंतीनिमित्त विविध सामाजिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. द्रोणागिरी गडावरील हौदातील पाण्याने महाराजांच्या प्रतिमेस अभिषेक घालण्यात आला. सापडलेल्या पुरातन शिवकालीन तोफेला सुद्धा अभिषेक घालण्यात आला. डाऊरनगर येथील जि. प. शाळेच्या प्रांगणात पाळणा गीत, प्रतिमा पूजन, प्राचीन वस्तू, नाण्यांचे पूजन करण्यात आले. या वेळी शिवकालीन नाणी व तोफ प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. शिवभक्तांना ज्यूस व पाणी वाटप करण्यात आले.

### बेलापूर किल्ल्याची स्वच्छता व सजावट

**नवी मुंबई :** शिवजयंतीनिमित्त शिरवणे गावातील युवकांनी शिरवणे ग्रामविकास युवा मंचमार्फत बेलापूर किल्ला स्वच्छता मोहीम हाती घेतली. या अनोख्या मोहिमेने शिवरायांना जयंतीनिमित्त मानवंदना देण्यात आली. किल्ला व बाजूचे बुरुज टेहळणी बुरुज संपूर्ण झाडून काढला तसेच पसरलेले छोटे दगड खुरटी गवते काढून किल्ल्याचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर किल्ल्यावर भगवे झेंडे लावले तसेच पताका लावून किल्ल्याची सजावट केली व त्यानंतर छत्रपतींची पूजा करून शिवजयंती साजरी केली. भरत ठाकूर, जयवंत पवार, अविनाश सुतार, प्रमोद भोईर, अजय भोईर, महेश पाटील, जीवन भोईर, माणिक कांबळे, सम्यक कांबळे व असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते.

### राजपूत युवक-युवती परिचय मेळावा


**नवी मुंबई** : राजपूत समाज सेवा संघ, महाराष्ट्र मुख्यालय ठाणे यांच्या वतीने समस्त राजपूत समाजातील विवाहोत्सुक युवक-युवतींकरिता सातवे राज्यस्तरीय परिचय संमेलनाचे आयोजन ठाणे येथे २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे. अर्जसंख्या मर्यादित असल्यामुळे इच्छूकांनी परिचय संमेलनाचा लाभ घेण्याकरिता https://forms.gle/om3abTuFUZquGLiY6 या लिंकच्या माध्यमातून २८ फेब्रुवारीपर्यंत सविस्तर माहितीसह परिचय अर्ज भरावा तसेच अधिक माहितीकरिता डॉ. अमरसिंह महाले (८८५०६१८६५२), तर तांत्रिक माहितीकरिता प्रितमसिंह चौहान (९७७३५५३४३०) यांना संपर्क साधावा, असे आवाहन राजपूत समाज सेवा संघाचे अध्यक्ष रामसिंह पाटील यांनी केले आहे.

### गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**पनवेल** : खारघर पत्रकार संघाचे संस्थापक सचिव संतोष वाव्हळ यांच्या निवासस्थानी गजानन महाराजांच्या १४४व्या प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त प्रतिमेचे पूजन व सत्यनारायण महापूजा, भजन, महाप्रसाद असे कार्यक्रम झाले. दर्शन व चा महाप्रसादाचा असंख्य भाविकांनी लाभ घेतला.

# कर्नाळा अभयारण्य परिसरात आगीचे सत्र

## पर्यावरण-पशुप्रेमींनी व्यक्त केली चिंता





**पनवेल : वार्ताहर**

निसर्गसंपदेने सुसज्ज असलेल्या कर्नाळा अभयारण्य परिसरात मागील काही दिवसांपासून आगीचे सत्र सुरू आहे. विशेष म्हणजे या आगीमुळे कर्नाळा किल्ला व अभयारण्यात परिसरातील वनसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत असल्याने पर्यावरण-पशुप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

कर्नाळा हे पक्ष्यांसाठी असलेले राज्यातील पहिले पक्षी अभयारण्य आहे. येथे तसेच किल्ल्याच्या सभोवती निसर्गसंपदा आहे, मात्र या परिसरात समाजातील काही घटकांच्या मार्फत ही आग लावण्याचा प्रयत्न केला जातो, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी केला आहे. कर्नाळा अभयारण्य परिसरात असलेल्या जीवसृष्टीला नुकसान पोहचविण्याच्या दृष्टीने होत असलेले हे प्रकार अभयारण्य व्यवस्थापन अथवा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून त्वरित थांबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी अभयारण्य परिसरात मोठ्या प्रमाणात वणवा लागला होता. रात्री उशिरापर्यंत हा वणवा सुरूच होता. या सर्व प्रकाराची चौकशी करण्यात यावी, तसेच ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी पर्यावरण-पशुप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

## मुंबई व कोकण विभागातील सहकारी संस्थांनी लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई व कोकण विभागातील सर्व सहकारी संस्था व संबंधित लेखापरिक्षकांनी आपल्या सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल तत्काळ संबंधित निबंधक कार्यालयास सादर करावे, असे आवाहन सहकारी संस्था (लेखापरूक्षण) मुंबई विभागाचे विभागीय सहनिबंधक राम शिर्के यांनी एका प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०मधील तरतुदीनुसार प्रत्येक संस्थेने आपल्या लेख्यांचे वैधानिक लेखापरीक्षण आर्थिक वर्ष समाप्तीनंतर चार महिन्यांच्या आत म्हणजेच दिनांक ३१ जुलैपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे, परंतु सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात संस्थांना त्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यासाठी १ ऑक्टोबर २०२१च्या शासन राजपत्रानुसार ३१ डिसेंबर २०२१पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सहकार कायद्यामधील तरतूदीनुसार संस्थांचा लेखापरीक्षण अहवाल लेखापरिक्षण पूर्ण झाल्यापासून एक महिन्याच्या आत आणि वार्षिक सर्वसाधरण सभेच्या नोटीस निर्गमनापूर्वी कोणत्याही परिस्थितीत न चुकता संस्था व संबंधित निबंधक कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे, मात्र मुंबई व कोकण विभागातील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित निबंधक कार्यालयांकडे सादर करण्याचे प्रमाण खूपच कमी असल्याचे आढळून आले आहे. मुंबई व कोकण विभागातील सर्व सहकारी संस्थांनी त्यांचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित निबंधक कार्यालयांकडे तत्काळ सादर करावे; अन्यथा संस्था व संबंधित लेखापरीक्षक हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील, असे राम शिर्के यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

## रसायनीतील पाणीपुरवठा आजही राहणार सुरळीत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील पाणीपुरवठा शुक्रवारीही (दि. २५) सुरळीतपणे चालू राहील, असे रसायनी-पाताळगंगाचे उपअभियंता एम. के. राजू यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. याबाबत कोणीही गैरसमज करू नये, असेही त्यांनी कळविले आहे.

जुने पाताळगंगा मोहोपाडा केंद्र योजनेच्या जलवाहिनीवरील दुरुस्तीच्या कामासाठी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८पासून रात्री १०पर्यंत पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग पाताळगंगा कार्यालयाने सांगितले होते, परंतु काही अपरिहार्य कारणामुळे या दुरुस्तीचे काम पुढील आदेश येईपर्यंत रद्द करण्यात आले आहे.

## कै. मुग्धा लोंढे यांच्या स्मरणार्थ कीर्तन सप्ताह

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त तसेच जागतिक महिला दिनाच्या औचित्याने कै. सौ. मुग्धा गुरूनाथ लोंढे यांच्या स्मरणार्थ कीर्तन सप्ताहाचे आयोजन पनवेलमधील श्री विरूपाक्ष महादेव मंदिरात करण्यात आले आहे.

कीर्तन सप्ताह ३ ते ९ मार्चपर्यंत विरूपाक्ष मंदिरात रोज रात्री ९.३० वाजता होणार असून यामध्ये विविध शहरातील नामांकित कीर्तनकार हे कीर्तन सादर करणार आहेत. त्यांना नंदकुमार कर्वे, गणेश घाणेकर (तबला) साथ संगत करणार आहेत.

क्रांतीचा जयजयकार कीर्तन सप्ताहास सर्व राष्ट्रप्रेमी भाविक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने व श्रद्धेने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक संदीप लोंढे आणि त्यांच्या परिवारातर्फे करण्यात आले आहे.



## नगरसेविका नेत्रा पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

### ▪ आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा





**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या नगरसेविका नेत्रा पाटील यांचा वाढदिवस गुरुवारी (दि. २४) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसानिमित्त खारघर सेक्टर १९मधील विरंगुळा केंद्रात मोफत महानोंदणी अभियान आयोजित करण्यात आले होते. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत नगरसेविका पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पक्ष खारघरच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोफत महानोंदणी अभियानात ० ते ५ वयोगटातील मुलांचे आधार कार्ड, आधार कार्डमध्ये अपडेट तसेच सुकन्या समृद्धी योजनेचे खाते काढून देण्यात आले. सुमारे ३००हून अधिक नागरिकांना या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरास भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, भाजप नेते किरण पाटील, दिलीप जाधव, भरत कोंडाळकर, संदीप एकबोटे, अर्चना बागल, लता कातोरे, गोपाल राजपूत, निरंजन पाटील, खारघर पोस्ट ऑफिसचे सचिन बडे, मल्लिका बिस्वास यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी नगरसेविका पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## रानसईत आदिवासींसाठी आरोग्य शिबिर

**उरण : वार्ताहर**

रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कातकरी आदिवासींसाठी कातकरी उत्थान योजना राबवून त्यांना त्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मंगळवारी (दि. २२) रानसई येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आदिवासींना कोविड प्रतिबंधक लसीकरणदेखील करण्यात आले.

या शिबिराला उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, मंडल अधिकारी सी. आर. पाटील, तलाठी भाऊ सिलकर आदी उपस्थित होते.

यामध्ये ५१ लहान मुलांची आणि १०२ प्रौढ व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे एका व्यक्तीला पहिला डोस, तर ७९ आदिवासींना दुसरा डोस देण्यात आला.





## खांदेश्वर कोकण महोत्सव





**पनवेल :** भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी आणि ओम साई खांदेश्वर महिला व बाल मित्र मंडळाच्या वतीने खांदा कॉलनीत खांदेश्वर कोकण महोत्सव सुरू आहे. सेक्टर ८ येथील पोलीस ठाण्यासमोरील मैदानावर आयोजित या महोत्सवाला बुधवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी पोलीस निरीक्षक कामत, सहाय्यक निरीक्षक खाडे, वाघ, हवालदार कुवर, पत्रकार राजेंद्र कांबळे, कैलास खोंडे आदी उपस्थित होते. महोत्सवाच्या आयोजक तथा उपमहापौर सीताताई पाटील, ज्येष्ठ नेते सदानंद पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

## कळंबोलीतील सोसायट्यांमध्ये हळदीकुंकू

### ▪ प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील यांचा उपक्रम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग समिती ब सभापती प्रमिला रविनाथ पाटील यांनी कळंबोलीत मनपा प्रभाग क्र.७मधील सोसायट्यांत जाऊन हळदीकुंकू समारंभ साजरा केला. याद्वारे महिलांना सौभाग्याचे वाण देण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप महिला मोर्चा कळंबोली शहर अध्यक्ष मनीषा निकम, उपाध्यक्ष प्रियंका पवार, सरचिटणीस दुर्गा सहानी, युवा उपाध्यक्ष कविता गुजर, उत्तर भारतीय महिला शहर अध्यक्ष मयुरी पेरवी, कार्यकर्त्या सरिता बसोने, राणी राणापूर, लैला शेख, सुलभा साखरे, पुष्पा पंचाक्षरी, नीता अधिकारी, श्वेता नगराळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ता आणि रहिवासी महिला उपस्थित होत्या, अशी माहिती भाजप कळंबोली कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल यांनी दिली.









## संपादकीय

# ढोंगीपणाचा कळस

गजाआड झाल्यानंतर नवाब मलिक यांनी राजीनामा द्यायलाच हवा ही भाजपची मागणी चुकीची म्हणता येणार नाही. केवळ भाजप मागणी करीत आहे म्हणून तिला नकार देणे सर्वथा अनुचित पायंडा पाडणारे ठरेल. त्यामुळे संवैधानिक प्रश्न निर्माण होऊ शकतो. राज्याचा कॅबिनेट मंत्री तुरुंगाच्या कोठडीतून आपल्या खात्याच्या अधिकाऱ्यांच्या बैठका कशा घेणार? विविध फायलींवर स्वाक्षऱ्या कशा करणार? मुख्य म्हणजे घटनेच्या बरहुकुम निष्पक्षपातीपणाने निर्णय कसे घेणार असे प्रश्न महाविकास आघाडीच्या नेत्यांना पडत नाहीत याचेच आश्चर्य वाटते.

**राज्याचे अल्पसंख्याकमंत्री आणि महाविकास आघाडीचे नेते नवाब मलिक यांना अटक झाल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. तसे होणे अपेक्षितच होते. मलिक यांची अटक राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिव्हारी लागली नसती तरच नवल होते. गेल्या २७ महिन्यांतील महाविकास आघाडी सरकारच्या कारकीर्दीत तुरूंगाची हवा खावी लागणारे मलिक हे दुसरे ज्येष्ठ मंत्री होत. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या स्थापनेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच नेते भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये अडकत आहेत. मलिक यांना बुधवारी दुपारी अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली व विशेष पीएमएलए न्यायालयासमोर त्यांना उभे करून १४ दिवसांच्या कोठडीची मागणी केली. न्यायालयाने सात दिवसांची ईडी कस्टडी मान्य केल्यानंतर मलिक यांची कारागृहात रवानगी झाली. त्यांच्या अटकेनंतर राजकीय घडामोडींना ऊत आला. राष्ट्रवादीचे सर्व मंत्री भराभरा सिल्व्हर ओक या पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानावर जमले. त्यानंतर खुद्द पवार यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचीही भेट घेतली. अखेरीस भाजपच्या राजकारणाला बळी न पडता मलिक यांचा राजीनामा मागायचा नाही असा निर्णय घेण्यात आला. मलिक यांना पाठिंबा देण्यासाठी आणि ईडीच्या तथाकथित जुलमी कारवायांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी गुरुवारी सकाळी दक्षिण मुंबईत धरणे आंदोलन केले. त्याला राष्ट्रवादीचे बहुतेक नेते उपस्थित होते. दोघा-तिघा काँग्रेस नेत्यांनी थोडावेळ हजेरी लावली. शिवसेनेतर्फे मात्र फक्त सुभाष देसाई हेच तेवढे थोडावेळ मुखदर्शन देऊन गेले. बाकी शिवसेनेचे सर्वच्या सर्व ज्येष्ठ नेते आंदोलनाच्या ठिकाणी फिरकले नाहीत. पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरेंसह अनेक नेते व मंत्री उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर गेले असल्याचे सांगण्यात आले. शिवसेनेचे काही मंत्री भराडी देवीच्या जत्रेसाठी कोकणात पसार झाले होते. थोडक्यात राष्ट्रवादीच्या या आंदोलनाला महाविकास आघाडीमध्येच फारसे समर्थन दिसून येत नाही. या तीन पक्षांमध्ये एकवाक्यता आहे ती फक्त खुर्च्यांबाबत. काहीही करून सत्ता टिकवायचीच या एकाच मुद्द्यावर एकत्र आलेल्या या तिन्ही पक्षांना बाकी कुठल्याही समस्येमध्ये किंवा जनतेच्या प्रश्नांमध्ये काडीचाही रस नाही हे आजवर अनेकदा दिसले आहे. मलिक यांच्या पाठिंब्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने आकाशपाताळ एक केल्याचे चित्र सध्या दिसत असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच आहे. आज ना उद्या मलिक यांना राजीनामा द्यावाच लागेल यात शंका नाही. त्यांनी राजीनामा देईपर्यंत भाजपनेदेखील राज्यभर आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे. मलिक यांचे प्रकरण हे निव्वळ भ्रष्टाचाराचे नसून ते राष्ट्राच्या सुरक्षेशी संबंधितदेखील आहे याचे भान तरी सत्ताधाऱ्यांनी ठेवावे. केवळ राजकारणासाठी राष्ट्रविरोधी कारवायांना अप्रत्यक्षपणे पाठबळ देणे महाराष्ट्रासाठीच नव्हे; तर संपूर्ण देशासाठी विघातक ठरेल.**

# वैद्यकीय महाविद्यालयाचे भूमिपूजन तर झाले...

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग तालुक्यातील उसर येथे रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय बांधण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन नुकतेच झाले. हे रुग्णालय सुरु झाल्यानंतर रायगडातील जनतेला चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील. दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया यासाठी मुंबई, पुण्यात जावे लागणार नाही. भविष्याचा रायगड जिल्ह्याचा विचार करता हे वैद्यकीय महाविद्यालय लवकर पूर्ण करून ते सुरु करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

रायगड हा मुबई आणि पुणे या दोन महानगरांना जवळ असलेला जिल्हा आहे. त्यामुळे येथे विकास वेगात होत आहे. मागील काही वर्षापासून या जिल्ह्यात विकासकामे वेगात होत आहेत. परंतु येथे आरोग्य सुविधा नाहीत. त्यामुळे या जिल्ह्यात चांगले रुग्णालय असावे, अशी रायगडकरांची इच्छा होती. मागील काही वर्षे या रुग्णालयासाठी प्रयत्न केले जात होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असावे अशी मागणी रायगडकरांची होती. वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे अवघड गोष्ट आहे. कारण त्यासाठी कमीत कमी ५०० ते ७०० बेड्सचे हॉस्पिटल असावे लागते आणि वैद्यकीय कर्मचारी व साधनसामग्री लागते. त्यात किमान ५०० कोटींची गुंतवणूक सुरुवातीला करावी लागते. ती गुंतवणूक केल्यानंतर महाविद्यालयासाठी वेगवेगळ्या सुविधा उभाराव्या लागतात. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारावी लागतात. केंद्र सरकारच्या अखत्यारितील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मंजूरी (आयएमसी) घ्यावी लागते. हे काम सोपे नाही.

उसर येथे जिल्हा शासकीय वैद्यकीय माहाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय बांधण्यास राज्य शासनाने मंजूरी दिली. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० खाटांचे सर्वोपाचार रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे. या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी तब्बल ४०६ कोटी ९६ लाख ६८ हजार ३३६ रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. अलिबाग तालुक्यातील उसर येथील जवळपास ५२ एकर जमिनीवर हे रुग्णालय बांधण्यात येणार आहे. त्यातील ३५ एकर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी वापरण्यात येईल. उर्वरित जागेत भविष्यात नर्सिंग कॉलेज तसेच इतर वैद्यकीय सुविधा उभारल्या जातील. सुरुवातीला या विद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. भविष्यात ही क्षमता १५० वाढविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. सध्या अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हे महाविद्यालय सुरू केले जाईल. तेथे ३०० खाटा आहेत. तीन वर्षामध्ये उसर येथील महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण केले जाईल. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालय उसर येथे हलविण्यात येईल. तेथे ५०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय असेल.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकरण वेगात होत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, जेएनपीटी अशा विविध विकासात्मक बाबी येथे आहेत. औद्योगिक विकास होत असताना त्यासाठी आवश्यक असलेल्या पायभूत सुविधादेखील निर्माण केल्या पाहिजेत. त्यातील आवश्यक बाब आहे, आरोग्य सुविधा. रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात चांगल्या आरोग्य सुविधा नाहीत. त्यामुळे दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया यासाठी आता मुंबई किंवा पुण्यात जावे लागते. उसर येथील वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपाचार रुग्णालय सुरु झाल्यानंतर रायगडातील गरीब जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील. त्यांना उपचारासाठी मुंबई किंवा पुण्यात जावे लागणार नाही. भविष्यात येथे आयुष आणि ॲलोपथी अशा एकत्र आरोग्य सुविधा येतील. नर्सिंग कॉलेज सुरु होईल. मेडिकल टुरिझम निर्माण करता येईल. यातून येथील भूमीपुत्रांना, स्थानिकांनाही रोजगार मिळेल. एकूणच या रुग्णालयामुळे सर्वसामान्यांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळतीलच शिवाय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारदेखील मिळणार आहे.

या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाचे भूमिपूजन झाले आहे. परंतु त्याचे प्रत्यक्ष काम सुरू करून ते वेळेत पूर्ण करणे हे आव्हान आहे. या महाविद्यालयाच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण करून हे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय जनतेच्या सेवेसाठी लवकर सुरू व्हावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

अलिबागचा इतिहास पाहाता येथे येणाऱ्या प्रकल्पांना सुरुवातीला विरोधच केला जातो. त्यामुळे अनेक प्रकल्प रखडले. अलिबागशेजारी नर्सिंग कॉलेज बांधण्यात येणार होते, परंतु त्याला विरोध करण्यात आला. जिल्हा क्रीडासंकूलासारखा महत्वाचा प्रकल्प अजूनही पूर्ण होऊ शकलेला नाही. रेवस-करंजा पूल रखडला. तसेच या वैद्यकीय महाविद्यालयाचे होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी. हा प्रकल्प जनतेच्या आरोग्याशी निगडीत असल्यामुळे स्थानिक जनतेने त्याला विरोध केला नाही.. कोणत्याही लोकप्रतिनिधीने वैद्यकीय महाविद्यालयाला विरोध केलेला नाही. राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारितील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने मंजूरी (आयएमसी) दिली आहे. त्यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामात तांत्रिक अडचणही नाही. गरज आहे ती इच्छाशक्तीची!

# कर्नाटकमधील कार्यकर्त्याच्या हत्येचा कर्जतमध्ये निषेध

**कर्जत : बातमीदार**

समान गणवेशासाठी भगव्या शालेचे आंदोलन उभे करणारे बजरंग दलाचे कार्यकर्ते हर्षा (वय २६) यांची कर्नाटकातील शिमोगा शहरात जिहादी विचारधारेच्या लोकांकडून हत्या करण्यात आली होती. बजरंग दलाच्या वतीने कर्जत येथे बुधवारी (दि. २३) या हत्येचा निषेध करण्यात आला.



(छाया : संतोष पेरणे)

हर्षा यांनी कर्नाटकात समान गणवेशासाठी भगव्या शालेचे मोठे आंदोलन उभे केले होते. त्यात हजारो युवकांनी भाग घेतला होता. त्यामुळे त्याची दिवसाढवळ्या भर रस्त्यात क्रूरपणे हत्या करण्यात आली. या हत्येच्या निषधार्थ कर्जत येथे बुधवारी बजरंग दलाकडून निदर्शने करण्यात आली. बजरंग दलाच्या प्रतिनिधींनी कर्जत तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदार विक्रम देशमुख यांना निवेदन सादर केले. यावेळी बजरंग दलाचे जिल्हा संयोजक साईनाथ श्रीखंडे, प्रखंड मंत्री विशाल जोशी, अध्यक्ष विनायक उपाध्ये, धर्मप्रसार प्रमुख दिनेश रणदिवे, अनंत हजारे, सचिन ठाकूर, रमेश नाईक, गायत्री परांजपे, दिनेश कडू, संदेश काळभोर, मनोज लाड यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## पेणमध्ये महिलांसाठी मोफत प्रशिक्षण

**पेण : प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या वतीने शहरातील गरजू व गरीब महिला, मुलींसाठी शिवणकाम, ज्युट बॅगचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त महिलांनी, युवतींना या संधीचा फायदा घ्यावा. या प्रशिक्षणासाठी नाव नोंदणीकरिता नगर परिषद कार्यालयात कार्यालीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन पेण नगर परिषदेचे प्रशासक जीवन ल. पाटील यांनी केले आहे.

# नागोठण्यात मोफत ई-श्रम कार्ड वाटप


(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील राजनंद सामाजिक संस्थेने नागोठणे कुंभार आळी येथील श्री गणपती हनुमान मंदिरात रविवारी (दि. २०) मोफत ई-श्रम कार्ड वाटप शिबिर आयोजित केले होते. यापुढेही असेच समाजोपयोगी कार्यक्रम संस्थेच्या वतीने राबविले जातील, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद नागोठणेकर यांनी या वेळी सांगितले.

नागोठण्याचे उपसरपंच मोहन नागोठणेकर, हभप तुकाराम घोसाळकर, ज्येष्ठ समाजसेवक श्रीधर नागोठणेकर, किरण लाड, पुरुषोत्तम घाग, सुदेश येरूणकर, अनिल नागोठणेकर, वसंत नागोठणेकर, संतोष नागोठणेकर, संतोष घाग, समीर रटाटे, किशोर नागोठणेकर, महादेव बोरीटकर, वैभव नागोठणेकर, अक्षय नागोठणेकर, संस्थेचे पदाधिकारी दिपक घोसाळकर, संदेश पोटे, विक्रम नागोठणेकर, राजेंद्र नागोठणेकर, गौरव नागोठणेकर, महेंद्र नागोठणेकर, सागर म्हशीलकर या वेळी उपस्थित होते.

# नेरळमध्ये श्री गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात साजरा

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील श्री कुसुमेश्वर देवस्थान आणि श्री गजानन महाराज मंदिर येथे बुधवारी (दि. २३) गजानन महाराज प्रकट दिन सोहळा साजरा करण्यात आला. गजानन महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी दोन्ही ठिकाणी भक्तांची मोठी गर्दी होती.

नेरळ ब्राम्हण आळीतील भजनी गायकांनी कुसुमेश्वर देवस्थान येथे प्रकट आरती आणि अभंगावाणी सादर केली. तर कल्याण-कर्जत रस्त्यावर असलेल्या श्री गजानन महाराज मंदिरात सकाळी काकड आरती, प्रकटदिन आरती आणि सायंकाळी महाआरती झाल्यानंतर भक्तांसाठी दर्शन सुरू झाले. कर्जत सावळे येथील सोमजाई भजन मंडळाने दुपारी अभंगवाणी सादर केली.तर चोरावले येथील जय डाबाया प्रासादिक भजन मंडळाने सायंकाळी भजने सादर केली.

श्री गजानन महाराज प्रकट दिन उत्सव समितीचे संतोष शेळके, स्वाती शेळके, दत्तात्रेय शेळके, डॉ. सुनिता सरोदे, अभिषेक शेळके तसेच भरत शेळके डॉ. दिनकर सरोदे, मंदिराचे विनायक काळे, नितीन मुरबाडकर, अशोक गायकवाड, जयेश शेळके, रत्नाकर (नंदू) कोळंबे आणि गुरु गोमारे यांचा प्रकटदिन सोहळा साजरा करण्यात महत्वाचा सहभाग होता.



# माथेरानचे विद्यार्थी शिकणार जपानी भाषा



**माथेरान, कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

येथील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिरमध्ये मंगळवार (दि. २२) जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला.

या प्रशिक्षण वर्गात मुलुंड मुंबई येथील जपानी भाषा शिक्षिका विद्या जबलपूरवाला आणि मुर्तुझा जबलपूरवाला या पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकविणार आहेत. आठवड्यातून एक दिवस प्रशिक्षण वर्ग सुरू राहणार आहे. गव्हाणकर विद्यामंदिरासह वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांना या प्रशिक्षण वर्गाचा लाभ घेता येणार आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन मंगळवारी करण्यात आले.शाळेचे शिक्षक संघपाल वाठोरे यांनी सर्वांचे स्वागत केले. गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील यांनी विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी रमेश ढोले, दिलीप अहिरे, दिनेश बागवे, सचिन भोईर, अनिश पाटील, संतोष चाटसे, साक्षी कदम यांच्यासह दोन्ही शाळांचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कायदेविषयक कार्यशाळेस माणगावमध्ये प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विनोद घायाळ यांच्या सहकार्याने आणि महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२३) कायदेविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत ॲड. स्वागता वडकर यांनी मोटार व्हेईकल ॲक्ट यासंबंधी माहिती दिली. त्यानंतर ॲड. सईम बहुर यांनी माहितीचा अधिकार कायदा २००५ विषयी माहिती दिली. अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण अत्याचार व त्यासाठी असणारी शिक्षा याविषयी ॲड. सदफ येलुकर यांनी विविध उदाहरणे देऊन माहिती सांगितली. प्रा. भारत पवार, अमित बाकाडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ७१ विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते.

# नागोठणे येथे शोभायात्रा; कपडे व वस्तूंचे वाटप

**नागोठणे : प्रतिनिधी**

कोईमत्तूर येथील मुमुक्षु दीक्षार्थी दिशीबेन किशोरजी राठोड यांची सोमवारी (दि. २१) नागोठण्यात रथातून शोभायात्रा (वर्षीदान) काढण्यात आली होती.

किशोर जैन (पेणवाले) यांच्या घरापासून वाजत गाजत निघालेली ही शोभायात्रा बाजार पेठमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून जैन मंदिरात समाप्त झाली. यावेळी जि.प. सदस्य किशोर जैन, जैन समाज अध्यक्ष प्रकाश जैन,सुरेश जैन, कोईमत्तूर निवासी सुकनराज राठोड यांच्यासह जैन समाज व चातुर्मास कमिटीचे पदाधिकारी, सदस्य समाज बांधव व महिला या शोभायात्रे मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

शोभायात्रेत दिशीबेन यांच्या हस्ते गोरगरीब जनतेला वस्तूंचे व कपड्यांचे वाटप करण्यात आले. क्षीणमोहाश्रीजी मारासाबजी यांच्या पावन सानिध्यात सूरत (गुजरात) येथे २१ मे २०२२ रोजी दिशीबेन (वय २२) यांचा दिक्षा कार्यक्रम होणार असल्याची माहिती किशोर जैन यांनी या वेळी दिली.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. २५ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ९. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- १०. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- ११. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# मंत्री मलिक यांचा राजीनामा घ्या

## भाजपची मागणी; अलिबाग, रोहा, मुरूड, खोपोलीत निदर्शने; निवेदन सादर



**अलिबाग : प्रतिनिधी**

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केलेले राज्याचे अल्पसंख्यांकमंत्री नबाब मलिक यांचा अलिबाग तालुका भाजपतर्फे गुरुवारी (दि. २४) निषेध करण्यात आला. मलिक यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी या वेळी करण्यात आली.

भाजपचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदारांना भेटून निवेदन दिले. यावेळी संतोष पाटील, सतिश लेले, कुर्डूस सरपंच अनंत पाटील, सुनील दामले, शैलेश नाईक, जगदीश घरत, समिर राणे, किशोर पाटील, राजू जाधव उपस्थित होते. १९९३ साली मुंबई बॉम्बस्फोट मालिकेत मृत्यू पावलेल्या निरपराध नागरिकांना भाजप कार्यालयात श्रद्धांजली वाहून तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

**धाटाव : प्रतिनिधी**

मुंबई बॉम्बस्फोटातील गुन्हेगारांशी संबंधित मनी लॉन्ड्रिंगप्रकरणी इडीने मंत्री नवाब मलिक यांना अटक केली. कोर्टाने त्यांना तीन मार्चपर्यंत कोठडी दिली. हा राष्ट्राच्या सुरक्षेचा व अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी मंत्री नवाब मलिक यांचा राजीनामा घ्यावा, अशा मागणीचे निवेदन भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित घाग यांनी गुरुवारी (दि. २४) रोहा तहसीलदार कविता जाधव यांना दिले. या वेळी भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शनेही केली.

रोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ नेते संजय कोनकर, जिल्हा चिटणीस प्रशांत सपकाळ, शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, युवामोर्चाचे तालुकाध्यक्ष राजेश डाके, महिला मोर्चा शहर अध्यक्षा जयश्री भांड, कामगार सेलचे राजेश डाके, सोशल मीडिया संयोजक सनिल इंगावले, अमर वारंगे, सरपंच रघुनाथ कोस्तेकर आदी भाजप पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री नवाब मलिक यांचा राजीनामा घेत नाही तोपर्यंत भारतीय जनता पक्ष आंदोलन चालूच ठेवेल, असे अमित घाग यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



(छाया : जितेंद्र जाधव)

(छाया : संजय करडे)



**मुरूड : प्रतिनिधी**

अल्पसंख्याकमंत्री नवाब मलिक यांच्यावर मनी लॉन्डरिंगसंदर्भात अंमलबजावणी संचालयाने कारवाई केली आहे तसेच मंत्री मलिक यांचा देश विघातक शक्तीशी असलेल्या घनिष्ठ संबंधाबाबत निषेध नोंदवत मुरुड तालुका भाजप कार्यकर्त्यांनी गुरुवारी (दि. २४) जोरदार घोषणाबाजी करून तहसीलदार रोहन शिंदे यांना निवेदन दिले. मुख्यमंत्र्यांनी मंत्री नबाब मलिक यांचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी मागणी या निवेदनामध्ये करण्यात आली आहे.

मुंबई बॉम्बस्फोट कटामधील देशद्रोही आरोपींकडून करोडो रुपयांची जमीन कवडीमोल दराने खरेदी करून देशविघातक कारवाई करणाऱ्यांसोबत घनिष्ठ संबंध असणाऱ्या मंत्री नवाब मलिक यांचा या निवेदनात तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करून त्यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुरूड तहसील कार्यालयाच्या आवारात ठाकरे सरकार हाय हाय, नवाब मलीक मुर्दाबाद अशा असंख्य घोषणाही दिल्या. भाजपचे मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, जिल्हा कमिटी सदस्य जनार्धन अण्णा कंधारे, शहराध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष बाळा भगत, महेश मानकर, तालुका सरचिटणीस नरेश वारगे, तालुका संघटक प्रवीण बैकर, युवामोर्चा अध्यक्ष अभिजित पानवलकर, जगदीश पाटील यांच्यासह शहरातील कार्यकर्ते या वेळी बहुसंख्येने उपस्थित होते.



**खोपोली : प्रतिनिधी**

केंद्रीय तपास यंत्रणेच्या कारवाईनंतर अटक झालेल्या राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. नवाब मलिक यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी खोपोलीत भाजपतर्फे गुरुवारी (दि. २४) शहरातील दीपक चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली.

भाजपचे खोपोली शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, शहर सरचिटणीस हेमंत नांदे, सहचिटणीस प्रमोद पिंगळे, संभाजी नाईक, जिल्हा कार्यकारीणी सदस्य स्नेहल सावंत, शहर कोषाध्यक्ष राकेश दाबके, युवा नेते सचिन मोरे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, माजी नगरसेविका अनिता शहा, शहर युवा मोर्चा सरचिटणीस विनायक माडपे, महिला मोर्चाच्या विमल गुप्ते, शक्ती प्रमुख सिद्धेश पाटील, बूथअध्यक्ष करण यादव, प्रदीप दळवी, सुनिती महर्षी यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात एक लाख ८२ हजार बालकांना दिला जाणार पोलिओ डोस

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात रविवारी (दि. २७) पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पाच वर्षांपर्यंतच्या एक लाख ८२ हजार २८९ बालकांना दोन हजार ५२५ बुथवर पोलिओ डोस देण्यात येणार आहेत. यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी दिली.

रविवारी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील एक लाख ८२ हजार २८९ बालकांना पोलिओ डोस देण्यात येणार आहे. त्याकरिता ग्रामीण भागात दोन हजार ३८२ आणि शहरी भागात १४३ असे एकूण दोन हजार ५२५ बुथवर लसीची व्यवस्था करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त बस डेपो, रेल्वे स्थानक इत्यादी ठिकाणीसुध्दा लस देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमासाठी पाच हजार ६४७ आरोग्य कर्मचाऱ्यांची बुथवर नेमणूक करण्यात आलेली असून, अंगणवाडी सेविका, आशा, शिक्षक तसेच खाजगी संस्थांचादेखील यामध्ये सहभाग घेण्यात आला आहे. पाच वर्षेपर्यंतच्या बालकांचे पोलिओसारख्या रोगापासून संरक्षण करण्यासाठी या लसीचा डोस देणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व बालकांना या दिवशी पोलिओची लस पाजून सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. किरण पाटील व डॉ. सुधाकर मोरे यांनी केले आहे.


### दैनिक रामप्रहर
**वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन**

(सेंट्रल रूल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**प्रकाशन स्थळ :** अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित

**प्रकाशनाचे कालमान :** दैनिक

**मुद्रकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.

**प्रकाशकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.

**संपादकाचे नांव :** देवदास लक्ष्मण मटाले

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** टॉवर ५, फ्लॅट नं. ६४, गोदरेज गार्डन इन्क्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई – ४०० ०७९

मी **कृष्णा चांगू ठाकूर** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. २५ फेब्रुवारी २०२२

**सही/–**
**कृष्णा चांगू ठाकूर**
**(प्रकाशकाची सही)**



रावसाहेब

प्रोसेस जमा ता.

ॲड. इर्शाद शेख पनवेल
अर्जदाराचे वकील

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज. क्र. २५१/२०२२
नि–८/ड
ने.ता. ०६/०४/२०२२

**श्रीमती. कलावथी के.,**
वय – ६५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. फ्लॅट नं. जी–५/५, बिल्डींग नं. जी–५, स्पगेटी,
प्राईम रोज को.ऑप.हौ. सोसायटी, सेक्टर १५,
खारघर, ४१०२१० ता. पनवेल, जि.रायगड
} अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै. कलानीधी एस. याचे दि. ०७/०५/२०२१ रोजी निधन झाले आहे. कै. कलानीधी एस. यांची आई श्रीमती. एस. शिवगामीत्री यांचे देखील दि. ०८/०३/१९९५ रोजी देहावसान झाले आहे. कै. कलानीधी एस. यांस मुलगा–मुलगी असे कोणतेही अपत्य नसल्यामुळे कै. कलानीधी एस. यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार ही विधवा पत्नी म्हणून एकमेव कायदेशिर वारस आहेत. **श्रीमती. कलावथी के.** ह्यांनी कै. कलानीधी एस. यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. कै. कलानीधी एस. यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे–खारघर, ता. पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर १५ मधील भुखंड कं. २२ वर बांधण्यात आलेल्या प्राईम रोज को.ऑप.हौसिंग सोसायटी या इमारतीचे बिल्डींग नं. ४/५ मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका कं. ५, क्षेत्र ५१.०५ चौ.मी. अशा वर्णनाची मिळकत.**

वर श्रीमती. कलावथी के ह्या कै. कलानीधी एस. यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे, कोर्ट श्रीमती, कलावथी के. यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. कलानीधी एस, यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क. लिपिक** **दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल**

कोर्टचा शिक्का

**सही/–** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल**


## कर्जत तालुक्याला पाणीटंचाईच्या झळा

### १८ गावे, ५७ आदिवासीवाड्यांसाठी आराखडा तयार



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्यात पाणीटंचाई जाणवू लागली असून तेथील ग्रामस्थांनच पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. दरम्यान, येत्या उन्हाळ्यात १८ गावे आणि ५७ आदिवासी वाड्यांना पाणीटंचाई भासेल असे गृहीत धरून कर्जत तालुका पाणीपुरवठा कृती आरखडा तयार करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील उल्हास नदी वगळता अन्य नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. त्यामुळे दरवर्षी मार्च महिना सुरु झाला की, तालुक्यातील अनेक गावे व वाड्यांना पाणीटंचाई जाणवते. तालुक्यातील पाणीटंचाई निवारण्यासाठी विंधन विहिरी खोदणे, विहिरींची दुरुस्ती करणे आणि ट्रँकरने पाणीपुरवठा करणे आदी कामे केली जातात. यावर्षी कर्जत तालुक्यात पाणीटंचाई भासणाऱ्या गावे व वाड्यांना ट्रँकरने पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यासाठी ३५ लाख ६५ हजाराच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील मोग्रज, पिंगळस, धामणी, खानंद, अंभेरपाडा, मोहोपाडा, भोपळेवाडी, सुतारपाडा, गरुडपाडा, खांडस, ओलमण, चेवणे, नांदगाव, ढाक, तुंगी, पेठ आणि अंथराट, वरेडी या १८ गावांचा समावेश पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये करण्यात आला आहे. तालुक्यातील आनंदवाडी, भक्ताचीवाडी, भल्याचीवाडी, पादिरवाडी, मेचकरवाडी, चौधरवाडी, जांभूळवाडी, बांगरवाडी, पेटारवाडी, काटेवाडी, चाफेवाडी, वडाचीवाडी, टेपाचीवाडी, मोरेवाडी, ताडवाडी, बनाचीवाडी, बेलाचीवाडी, भागूचीवाडी दोन्ही, मेंगाळवाडी, चिमटेवाडी, विठ्ठलवाडी, तेलंगवाडी, किरवली ठाकूरवाडी, सावरगाव ठाकूरवाडी, हऱ्याचीवाडी, विकासवाडी, आषाने ठाकूरवाडी, नागेवाडी, जांभुळवाडी, वारे, बोरीचीवाडी, कळंब, चिंचवाडी, मिरचुलवाडी, काळ्याचीवाडी, पाली धनगरवाडी, आसलवाडी, नाण्याचा माळ, आसल धनगरवाडा, सागाचीवाडी, भूतीवलीवाडी, धामणदांड, ठोंबरवाडी, कळकराई, बेकरेवाडी, माणगाववाडी, स्टेशन ठाकूरवाडी, नवसूचीवाडी, खाड्याचापाडा मधली वाडी, चाहूचीवाडी, दामत कातकरीवाडी आदी ठिकाणी मार्चपासून पाणीटंचाई उद्भवणार असल्याचे गृहीत धरण्यात आले आहे.

पाणीटंचाई वर मात करण्यासाठी ट्रँकरने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ट्रँकर सुरू केले जाणार आहेत. ट्रँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी यावर्षी २४.६० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. त्याचवेळी पाणीटंचाई निर्माण होण्याआधी चार गावे आणि १४ आदिवासीवाड्यांमध्ये बोअरवेल खोदल्या जाणार आहेत. त्यात चेवणे, बोंडशेत, खरवंडी आणि पोटल कळंबेपाडा या गावांचा तर फोंडेवाडी, बेलदारवाडी, बनाचीवाडी, खरवंडी आदिवासीवाडी, भिवपुरी कातकरीवाडी, स्टेशन ठाकूरवाडी, मोरेवाडी, लाखाचीवाडी, ताडवाडी, ऐनवाडी, इंजिवली वरई, भोंबलवाडी आणि धाकटे वेणगाव येथे नवीन विंधण विहिरी खोदल्या जाणार आहेत. त्याचबरोबर जुन्या १८ विंधण विहिरींची दुरुस्तीदेखील केली जाणार असून त्यासाठी ११ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## किल्ले रायगड परिसरात डोंगरउतारावर भूसंपादन करण्यास स्थानिकांचा आक्षेप

### महाड उपविभागीय अधिकाऱ्यांना ग्रामस्थांचे निवेदन

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर आणि परिसरात रायगड प्राधिकरण आणि शासनाच्या माध्यमातून विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत, मात्र या विकासकामांसाठी डोंगर उतारावरील जमिनी संपादित करण्याचा डाव स्थानिक प्रशासन आणि जमीन विक्रेत्यांनी रचला असून त्याला रायगडवाडी, हिरकणीवाडीमधील ग्रामस्थांनी आक्षेप घेत अशा जमिनी संपादित केल्या जावू नयेत, याकरिता महाड उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

किल्ले रायगडावरील ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्याबरोबरच गड आणि परिसरात शिवभक्तांसाठी विविध सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परिसरात वाहनतळ, शौचालये, वीज व्यवस्था, निवासाची सुविधा आदी सुविधा करण्यासाठी जमिनींची आवश्यकता आहे, मात्र गडाचा परिसर डोंगरउतारावरील असल्याने या ठिकाणी जागा मिळणे कठीण झाले आहे शिवाय येथील स्थानिक शेतकरी सहजासहजी जमीन देण्यास राजी नाहीत. असे असले तरी काही पडीक जमिनी धनदांडग्या लोकांनी आपल्या फायद्यासाठी घेतल्या आहेत. त्याला आक्षेप घेत स्थानिक ग्रामस्थांनी नव्या संपादनाला विरोध दर्शवला आहे. त्यांनी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांना याबाबत निवेदन सादर करून फेरविचार करण्याची मागणी केली आहे.

पाचाड येथे शिवसृष्टीला संपादित केलेल्या जागेपैकी सुमारे ४० टक्के जागा तीव्र उतारावरील आहे. यातील बहुतांश जागा ही स्थानिक शेतकऱ्यांकडून अल्प दरात घेवून शासनाला प्रती गुंठा दराने विकली आहे. अशाच प्रकारे आता रायगडवाडीमधील सर्व्हे नंबर १५८/०, ७८/१अ, ७८/१ब, ७८/२ब, ७८/२ ड, आणि इतर क्षेत्र असलेल्या जमिनी वाहनतळासाठी संपादित करण्याची हालचाली सुरु होताच स्थानिक ग्रामस्थांनी सदर जागा ही डोंगर उतारावरील असून यावर आपण वाहनतळ कसे उभे करणार असा प्रश्न केला आहे. यामुळे या भू संपादनाचा निवाडा रद्द करण्यात येवून रक्कम अदा केली जावू नये, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या वेळी भाजपचे महाड तालुका सरचिटणीस महेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर सावंत, भाजपचे चंद्रजित पालांडे, अजित औकीरकर, लहू औकीरकर, निलेश तळवटकर उपस्थित होते. याबाबत निजामपूर ग्रामपंचायतीनेदेखील हरकत घेतली आहे.

तज्ज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली रायगड परिसरातील जमिनींचा सर्व्हे करूनच या जमिनी संपादित केल्या जाव्यात, अशी मागणी सरपंच प्रेरणा प्रभाकर सावंत आणि उपसरपंच गणेश औकीरकर यांनी केली आहे.



**छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातच जर कोणी परप्रांतीय धनदांडगा स्थानिक शेतकऱ्यांची फसवणूक करून स्वतःचे घबाड भरणार असेल, तर ते आम्ही खपवून घेणार नाही. डोंगरउतारावरील जागा संपादनाला आमचा विरोध राहील. याकडे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांना लक्ष घालण्याची विनंती करू.**

**–महेश शिंदे, सरचिटणीस, महाड तालुका भाजप**

**यापूर्वी संपादित झालेल्या जमिनींबाबत आपणास अधिक माहिती नाही, मात्र काही भाग डोंगरउतारावरील आहे. ग्रामस्थांनी केलेल्या मागणीचा विचार करून योग्य पद्धतीच्या जमिनी संपादित केल्या जातील.**

**–प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय अधिकारी, महाड**


### अंतिम सभेची नोटीस

खालील नमूद अवसायनातील सहकारी संस्थाची शेवटची सर्वसाधारण सभा संबंधीत अवसायक यांच्या अध्यक्षतेखाली **सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय मिडलक्लास हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ८३, सुशिल निवास, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड** या कार्यालयात आयोजित केली असून त्याची सविस्तर सभा नोटीस (उपस्थितांच्या अटी व शर्तीसह) सदर कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी संबंधित संस्थेच्या सर्व सभासदांनी नोटीस बोर्डावर सविस्तर नोटीस पाहून सभेस उपस्थित राहून कामकाजामध्ये भाग घ्यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | नोंदणी क्रमांक व दिनांक | अवसायकाचे नाव, पदनाम, कार्यालयाचे पत्ता | अंतिम सभेचा दिनांक वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | न्हावायार्ड एम्प्लॉईज क्रेडीट सोसायटी लि., न्हावा, पनवेल | क्र. ५१९, दि. १७/११/१९९४ | श्री. एस. के. पाटील अप्पर उप लेखापरीक्षक सह संस्था, हरिहर बिल्डींग, तळमजला, रुम नं. ०४, वृंदावन लॉज जवळ पनवेल जि. रायगड | दि. २५/०३/२०२२ सकाळी ११.०० वा |
| २ | महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, रसायनी, ता, पनवेल | क्र. ३१४, दि. ५/५/१९७८ | श्री डी बी धायगुडे सहाय्यक सहकारी अधिकारी अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल | दि. २५/०३/२०२२ सकाळी ११.०० वा. |
| ३ | ओमसाई बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था मर्या., पनवेल. | क्र. १३९९, दि. २२/०४/२०१३ | | दि. २५/०३/२०२२ दुपारी ३.०० वा. |
| ४ | समर्थ महिला सेवा सहकारी संस्था मर्या., | क्र. ३८०९, दि. ११/०५/२०१८ | श्री विजय सडके, मुख्य लिपिक अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल ४१०२०६ | दि. २५/०३/२०२२ सकाळी ११.०० वा. |

**सही/–** **एस. के. पाटील** **(अवसायक)**

**सही/–** **दत्तात्रेय धायगुडे** **(अवसायक)**

**सही/–** **विजय सडके** **(अवसायक)**

# आज पाटणा वि. दिल्ली फायनल

प्रो कबड्डी लीग

बंगळुरू : वृत्तसंस्था

**प्रो कबड्डी लीगमध्ये पाटणा पायरेट्स आणि दबंग दिल्ली यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत पाटणाने यूपी योद्धावर, तर दिल्लीने बंगळुरू बुल्सवर मात केली. अंतिम लढत शुक्रवारी (दि. २५) रंगणार आहे.**



## पाटणाने यूपीला नमवले

**बंगळुरू** : मोहम्मदरझा शॅडलोईच्या दिमाखदार पकडींमुळे पाटणा पायरेट्स संघाने चौथ्यांदा प्रो कबड्डी लीगची अंतिम फेरी गाठली. प्रदीप नरवाल पूर्वाश्रमीच्या पाटणा संघाविरुद्ध निष्प्रभ ठरल्याने यूपी योद्धा संघाला २७-३८ अशी हार पत्करावी लागली.

पहिल्या उपांत्य सामन्यात पाटण्याने दोन मिनिटे आधी दुसरा लोण यूपीवर चढवला आणि पहिल्या सत्रात २३-९ अशी निर्विवाद आघाडी मिळवली. यूपीने दुसऱ्या सत्रात रणनीती बदलून सामना वाचवण्याचा कसोटीने प्रयत्न केला, पण ते अपयशी ठरले. यूपी संघातील प्रदीपच्या १६ चढायांमध्ये सहा पकडी झाल्या, तर पाच चढाया निष्फळ ठरल्या. त्यामुळे फक्त पाच गुण त्याला कमावता आले. त्या तुलनेत बदली खेळाडू श्रीकांतने जाधवने दिमाखदार कामगिरी करताना १० गुण मिळवले.

पाटण्याकडून मोहम्मदरझा आणि सुनील यांनी पकडींचे अनुक्रमे सहा आणि पाच गुण मिळवले. याचप्रमाणे सचिनने चढायांचे सात आणि गुमान सिंगने चढायांचे आठ गुण मिळवले.



## दिल्लीची बंगळुरूवर सरशी

**बंगळुरू** : प्रो कबड्डी लीगमध्ये रंगतदार झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात दबंग दिल्लीने बंगळुरू बुल्सवर ४०-३५ असा विजय मिळवला. बंगळुरूच्या पवन सेहरावतने या सामन्यात सर्वाधिक १५ रेड पॉईंट्स केले, तर नवीन कुमारने ११ गुण मिळवत दिल्लीला अंतिम फेरीत नेले. दिल्लीने बंगळुरूला प्रथम रेडसाठी आमंत्रित केले.

सामन्याच्या पहिल्या रेडमध्ये पवन सेहरावतने संघाचे खाते उघडले. त्यानंतर बंगळुरूने नवीन कुमारला टॅकल करीत दुहेरी आघाडी मिळवली. चंद्रन रणजीतला जीवा कुमार आणि संदीप नरवाला यांनी टॅकल करून स्कोअर ३-३ असा बरोबरीत आणला. यानंतर दिल्लीने दमदार खेळ दाखवत बंगळुरूला ऑलआऊटच्या जवळ आणले. त्यानंतर विजय मलिकच्या टॅकल आणि पवन सेहरावतच्या एका पॉइंटच्या जोरावर बंगळुरूने स्कोअर १०-१० असा केला. पवनने आणखी एक गुण घेत सुपर १० पूर्ण केला. यानंतर दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत झाली आणि स्कोअर १४-१४ असा बरोबरीत राहिला. पूर्वार्धाच्या शेवटच्या चढाईत मनजीत चिल्लरने टॅकल केले आणि एका गुणाची आघाडी घेतली. २० मिनिटे संपल्यानंतर बुल्स १७-१७ने आघाडीवर होते.

उत्तरार्धाच्या सुरुवातीलाच कृष्णा धुलने पवन सेहरावतला धूळ चारत दिल्लीला आघाडी मिळवून दिली. यानंतर मनजीत चिल्लरने भरतला टॅकल करीत दिल्लीला २२-१८ अशी आघाडी मिळवून दिली. जयदीप आणि महेंद्रसिंग यांनी नवीनला सुपर टॅकल केले आणि पवनला मॅटवर परत आणले. पवन येताच बुल्सला १६ मिनिटांनी आलेल्या रेडमध्ये एक पॉइंट मिळाला. नीरज नरवालने सुपर रेड करीत दिल्लीला पुन्हा पुढे केले. या सुपर रेडमध्ये सौरभ नंदल, अमन आणि सेहरावत यांना मॅटमधून बाहेर पडावे लागले. नवीनने भरतला सलग दोनदा बाद करून संघाला ३१-२४ अशी आघाडी दिली. ३३व्या मिनिटाला नवीनने सुपर रेड करत दिल्लीचे अंतिम तिकीट जवळपास बुक केले. नवीनने आणखी एक मल्टी रेड करीत सुपर १० पूर्ण केला.

## ...तर नऊ खेळाडूंसह संघाला उतरावे लागणार मैदानात

### आयसीसीचा नवा नियम

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला विश्वचषक पुढील महिन्यापासून न्यूझीलंडमध्ये खेळवला जाणार आहे. कोरोनामुळे स्पर्धेमध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) नियमात बदल केला आहे. या अंतर्गत जर एखाद्या संघात कोरोना पसरला तर तो संघ किमान नऊ खेळाडूंसह मैदानात उतरू शकेल. नुकत्याच वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या झालेल्या अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत या नियमाचा वापर करण्यात आला.

आयसीसी हेड ऑफ इव्हेंट ख्रिस टेटली म्हणाले, जर एखाद्या संघात कोरोना पसरला तर संघ ११पेक्षा कमी खेळाडूंसह मैदानात उतरू शकतो आणि गरज पडल्यास संघ व्यवस्थापन व कोचिंग स्टाफमधून लोकांना प्लेइंग-११ मध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. जर आवश्यक असेल तर आम्ही एका संघाला नऊ खेळाडूंना मैदानात उतरवण्याची परवानगी देऊ आणि जर संघात व्यवस्थापन व कोचिंग स्टाफमध्ये महिला सदस्य असतील तर ते पर्याय म्हणून मैदानात उतरू शकतील, मात्र दोन्ही खेळाडूंना गोलंदाजी किंवा फलंदाजी करता येणार नाही.




## सुभाष पुजारी 'मास्टर भारत श्री'

### सलग दुसऱ्या वर्षी पटकावला किताब

**खोपोली : प्रतिनिधी**

सहायक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी दुसऱ्यांदा मास्टर मि. भारत श्री २०२२ किताबाचे मानकरी ठरले आहेत.

इंडियन बॉडीबिल्डींग फेडरेशनच्या वतीने तामिळनाडू पाँडेचरी येथे आयोजित करण्यात आलेल्या मास्टर भारत श्री २०२२ या शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी ८० किलोंवरील गटामध्ये सुवर्णपदक पटकाविले आणि गौरवाची बाब म्हणजे हा किताब त्यांनी सलग दुसऱ्यांदा पटकाविला.

पुजारी यांची १५ जुलै रोजी मालदीव येथे होणाऱ्या मि. एशिया या आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय संघातून निवड झाली आहे. ते सध्या 'मि. ऑलिम्पिया' सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत.

## प्रज्ञानंदची विजयी घोडदौड सुरूच

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा किशोरवयीन ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने एअरिथिंग्स मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेतील चमकदार कामगिरी कायम राखली. प्रज्ञानंदने मंगळवारी ऑनलाइन स्वरूपातील जलद प्रकाराच्या स्पर्धेत आणखी दोन विजय नोंदवले.



चेन्नईच्या १६ वर्षीय प्रज्ञानंदने सोमवारी नॉर्वेचा जगज्जेता मॅग्नस कार्लसनला पराभवाचा धक्का दिला होता. मंगळवारी झालेल्या १०व्या फेरीत प्रज्ञानंदने रशियाच्या आंद्रे इसिपेन्कोला ४२ चालींमध्ये पराभूत केले. ११व्या फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसतारोव्हशी त्याने बरोबरी साधली. मग १२व्या फेरीत ॲलेक्झांड्रा कोस्टेन्यूकवर ६३ चालींमध्ये मात करून त्याने दुसरा विजय नोंदवला. त्यापूर्वी नवव्या फेरीत रशियाच्या इयान नेपोम्निशीने प्रज्ञानंदला नमवले. १२व्या फेरी अखेरीस प्रज्ञानंद १५ गुणांसह १२व्या, तर नेपोम्निशी २७ गुणांसह अग्रस्थानी आहे.



**पनवेल : गोल्डन स्पोर्ट्स क्लब न्हावाच्या वतीने गावदेवी मैदानावर क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर व अन्य मान्यवर.**

## 'सीकेटी'त शरीरसौष्ठव स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २३) शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन अमृले प्रमुख पाहुणे उपस्थित होते. त्याचप्रमाणे शरीरसौष्ठव संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेत मुंबई विद्यापीठशी संलग्न असणाऱ्या विविध महाविद्यालयांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला. या वेळी महाविद्यालयाचे क्रीडा समन्वयक आणि जिमखाना समितीचे प्रमुख डॉ. व्ही. बी. नाईक यांनी उपस्थित पदाधिकारी व स्पर्धक यांचे स्वागत केले.




स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्याकरिता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएससी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रूसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी प्रा. अनिल नक्ती, प्रा. अजिंक्य भगत आणि जिमखाना समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.





**उलवे नोड : स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटना खारकोपर-उलवे नोड यांच्या वतीने श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन सेक्टर १७मधील रिक्षा नाका येथे करण्यात आले होते. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट देऊन दर्शन घेतले. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, एन. सी. घरत, वामनशेठ म्हात्रे, अनंता ठाकूर, दामोदर भोईर, व्ही. के. ठाकूर, किशोर पाटील, गजानन घरत, आशिष घरत, सुधीर ठाकूर, कमलाकर घरत, राजू देशमुख, महिला मंडळ उपस्थित होते.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com